# मेट्रो डब्यांचे चार्जिंग सुरू

मुंबई : कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ मार्गाच्या पहिल्या ट्रेनच्या आठ डब्यांचे उच्च दाबाने चार्जिंग सुरू करीत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसीएल) स्वातंत्र्य दिन साजरा केला. आता पुढील काही दिवस गाडीतील यंत्रणेची पडताळणी केली जाणार आहे.

मेट्रो ३ वरील पहिल्या मेट्रो गाडीच्या मार्गिकेवरील चाचण्यांना या महिन्याच्या अखेरीस सुरुवात केली जाणार आहे. त्यापूर्वी डब्यातील यंत्रणेच्या चाचण्या केल्या जात आहेत. त्याच प्रक्रियेचा भाग म्हणून उच्च दाबाने ट्रेनच्या डब्यांना विजेचा पुरवठा केला जात आहे. त्यामुळे आता डब्यातील वातानुकूल यंत्रे, संवाद प्रणालीमध्ये असणारे भोंगे, विद्युत यंत्रणा यांच्या चाचण्या घेणे सुरू झाले आहे. या चाचण्या यशस्वी झाल्यावर मेट्रोच्या आरे ते मरोळ दरम्यान मार्गिकेवरील चाचण्या प्रत्यक्ष सुरू होणार आहेत.